गुरुवार, दि. २७ मार्च २०२५ ● जालना ● वर्ष ६ वे ● अंक २३४ वा ● किंमत २ रु. ● पाने ०४

8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886

विघ्नहर्ता हॉस्पिटल
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
मोरया मेडीकल अँण्ड जनरल स्टोअर्स
MEDICAL
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
एक वेळ अवश्य भेट द्या
डॉ. आनंद भाले Mob. 8208427524
प्रो.प्रा. विशाल देशमुख Mob. 7770084597

https://yuvaadarsh.com

# युवा आदर्श

संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके

https://facebbook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/ RNI: MAHMAR/2019/78282

### जलसंपदा मंत्र्यांच्या आदेशाला अधिकाऱ्यांची केराची टोपली; महिनाभराचा वेळ दिला असतांना अवघ्या १० दिवसातच केले पाणी बंद

## मुजोर अधिकाऱ्यांचे तात्काळ निलंबन करा - आ. बबनराव लोणीकर

**मुंबई -** दिनांक १६ मार्च रोजी विधिमंडळ सभागृहात आमदार बबनराव लोणीकर यांनी वॉटर ग्रीड पाणीपुरवठा बंद केला असल्याबाबत उपस्थित केलेला प्रश्नाचे उत्तर देताना जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी एक महिन्याचा कालावधी दिलेला होता परंतु इंग्रज व रझाकारी प्रवृत्तीच्या पाटबंधारे विभागाच्या कार्यकारी अभियंता कोरके यांनी दहा दिवसातच संपूर्ण पाणीपुरवठा बंद केला आहे. मंत्र्यांनी दिलेल्या उत्तराला पाटबंधारे विभागाच्या कार्यकारी अभियंता श्रीमती कोरके यांनी केराची टोपली दाखवली आहे. १३ कोटी लोकांच्या अडचणी सोडवण्यासाठी असलेल्या विधिमंडळाच्या सभागृहात खुद्द जलसंपदा मंत्री यांनी शब्द दिलेला असताना अधिकाऱ्यांनी मात्र तो नजुमानता मुजोरी करत पाणीपुरवठा बंद केला आहे.

परतुर विधानसभा मतदारसंघात शुद्ध पिण्याचे पाणी पुरवठा करण्यासाठी १७३ व ९५ ग्रीड पाणी पुरवठा योजना ता. परतुर मंठा, जालना या तीन तालुक्यांसाठी तयार करण्यात आली आहे. सध्या सगळीकडे पाणी टंचाई भासत असल्यामुळे गांवकऱ्याची पाणी पुरवठा सुरळीत करण्याची मागणी होती. त्याचप्रमाणे होळी धुलीवंदन व रमजान हे हिंदू व मुस्लिम धर्मीयांचे महत्त्वाचे सण सुरू होते. १७३ व ९५ गाव ग्रीड पाणी



पुरवठा योजना ता. परतुर मंठा, जालना या योजनांचा बिगर सिंचन पाणी पुरवठा खंडीत करण्याची नोटीस प्राप्त झाली होती. परंतु या विभागास देयके उशीरा प्राप्त झालेली असुन त्यांची मागणी वरीष्ठ कार्यालयाकडे सादर केलेली आहे. सदर देयकाचा निधी प्राप्त झाल्या नंतर देयके त्वरीत अदा करण्यांत येईल. बिगर सिंचन पाणी पुरवठयाच्या उपसा केंद्राचा पाणी पुरवठा बंद केलेला होता तो तात्काळ सुरू करण्यात यावा अशी मागणी दिनांक १६ मार्च रोजी विधिमंडळ सभागृहात आमदार बबनराव लोणीकर यांनी केली होती.

जलसंपदा मंत्री गोदावरी व कृष्णा खोरे श्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी वसुलीसाठी एक महिन्याचा कालावधी देत सकारात्मकता दाखवली होती तसेच तात्काळ पाणीपुरवठा सुरू करण्यात येईल त्यासंबंधी संबंधित कार्यकारी अभियंता यांना सूचना देण्यात येईल असे स्पष्ट केले. पाटबंधारे विभागाच्या वतीने वसुली करण्यासाठी कुठलेही प्रयत्न करण्यात आलेले नाहीत असे असताना पाटबंधारे विभागाच्या कार्यकारी अभियंता मनमानी कारभार करत असून इंग्रज व रझाकरांच्या काळात देखील अशा प्रकारच्या यातना सर्वसामान्य नागरिकांना देण्यात आल्या नाही अशा प्रकारे वागत आहेत. वसुलीसाठी कुठलेही प्रयत्न न करता ९५ गावांचा पाणीपुरवठा बंद करणे हे अत्यंत गंभीर बाब आहे असे आमदार बबनराव लोणीकर यावेळी म्हणाले

पाणीपट्टी वसुली करण्यासंदर्भात मी स्वतः स्थानिक पातळीवर सूचना दिलेल्या असून त्यासंदर्भाने प्रत्यक्ष गावात जाऊन वसुली करणे, ग्रामसभा घेणे, पाणीपट्टी भरणे संदर्भात प्रचार प्रसार करणे, परतुर व मंठा या दोन्ही तालुक्याच्या ठिकाणी जनता दरबार घेणे व अधिकाधिक पाणीपट्टी वसुली करणे यासारख्या माध्यमातून लवकरात लवकर वसुली करून पाणीपट्टी भरली जाणार आहे असे असताना पाटबंधारे विभागाच्या कार्यकारी अभियंता श्रीमती कोरके यांनी १० दिवसातच जलसंपदा मंत्री यांच्या विधिमंडळातील आश्वासनाला हरताळ फासला आहे अशा मुजोर अधिकाऱ्यांचे तात्काळ निलंबन करण्यात यावे अशी मागणी आमदार बबनराव लोणीकर यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व जलसंपदामंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्याकडे लेखी पत्राद्वारे केली आहे. अशी माहिती देखील आमदार बबनराव लोणीकर यांनी यावेळी दिली.

## ग्रंथ हे ज्ञानाचे प्रेरणा स्त्रोत

### जिल्हाधिकारी डॉ. पांचाळ ; 'जालना ग्रंथोत्सव २०२४' चे उद्घाटन



**जालना । प्रतिनिधी -** चांगल्या शरीरासाठी नियमित व्यायाम तर चांगल्या मनासाठी वाचन आवश्यक आहे. नियमित वाचनामुळे वैचारिक कक्षाही रुंदावतात. ग्रंथ हे ज्ञानाचे प्रेरणा स्त्रोत असल्याने वाचन संस्कृती अधिक वाढण्यासाठी प्रशासनाकडून जिल्ह्यातील शाळांना ग्रंथ उपलब्ध करुन देण्यात येणार असल्याचे जिल्हाधिकारी डॉ.श्रीकृष्ण पांचाळ यांनी सांगितले.

महाराष्ट्र शासनाच्या उच्च व तंत्र शिक्षण विभाग, ग्रंथालय संचालनालय आणि जिल्हा ग्रंथालय अधिकारी यांच्या संयुक्त विद्यमाने 'जालना ग्रंथोत्सव २०२४ चे आयोजन जालना येथील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर भवन, टाऊन हॉल येथे करण्यात आले आहे. या भव्य ग्रंथोत्सवाचे उद्घाटन जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ यांच्या हस्ते करण्यात आले. त्यावेळी ते बोलत होते. यावेळी ग्रंथोत्सवाचे अध्यक्ष कवी डॉ. ललित अधाने, सहायक ग्रंथालय संचालक सुनिल हुसे, कवयित्री डॉ. संजिवनी तडेगावकर, जालना जिल्हा ग्रंथालय संघाचे अध्यक्ष राजेश राऊत, जिल्हा ग्रंथालय अधिकारी सुभाष साबळे यांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी उपस्थितांना मार्गदर्शन करतांना जिल्हाधिकारी डॉ. पांचाळ म्हणाले की, ग्रंथ हे मानवी जीवनातील खरे गुरु आहेत. विविध ग्रंथाद्वारे मानवाच्या ज्ञानात भर पडत असते. ग्रंथामुळे मिळालेल्या ज्ञानाच्या आधारे माणसाला प्रेरणा व प्रोत्साहन मिळते. कुणालाही पुस्तके वाचल्याशिवाय त्यांचे महत्व कळत नाही. जसे आपणांस चांगले शरिर पाहिजे असेल तर नियमित व्यायामाची आवश्यकता असते, तसेच चांगले विचार येण्यासाठी ज्ञान वाढविण्यासाठी नियमित वाचन आवश्यक आहे. वाचानाची सवय ही अंगवळणी पडणे आवश्यक आहे. आजच्या मोबाईलच्या युगात वाचनसंस्कृती जोपासण्यासाठी शासनामार्फत ग्रंथोत्सवचे आयोजन करुन वाचन संस्कृती वाढविण्याचा प्रयत्न केला जात आहे. ग्रंथ हे ज्ञानाचे प्रेरणा स्त्रोत असल्याने जिल्हा वार्षिक योजने अंतर्गत जिल्ह्यातील शाळांना विविध प्रकारचे ग्रंथ उपलब्ध करुन देण्यात आले आहे. यापूढे ही शाळांना ग्रंथ उपलब्ध करुन देण्यात येतील. तसेच जिल्हाधिकारी कार्यालयात ही ग्रंथालय सुरु करण्याचा मानस असल्याचे जिल्हाधिकारी डॉ. पांचाळ यावेळी म्हणाले. तसेच जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ यांनी यावेळी वाचनाविषयी स्वतःचे अनुभव कथन करत वाचनाने विचारसरणीत फरक पडतो. जीवनात काही चांगल्या गोष्टी सांगून आत्मसात होत नसतात, तर वाचनाची सवय निर्माण करावी लागते असे सांगितले.

ग्रंथोत्सवाचे अध्यक्ष कवी डॉ. ललित अधाने म्हणाले की, ग्रंथ हे अभिव्यक्तीचे मोठे साधान आहे. जीवनमूल्ये अधोरेखित करण्याचे काम साहित्य करते. ग्रंथ हे समाजाला दिशा देण्याचे काम करतात. स्वतःला अद्यायावत ठेवणे, आजच्या स्पर्धेच्या युगात यशस्वी होण्यासाठी वाचनाला पर्याय नाही. आज मोबाईलवर सर्व काही उपलब्ध असले तरी जीवनात पुस्तक वाचनाला खुप महत्व आहे. कारण वाचनामुळे मानवाच्या विचारात प्रगल्भता येते. पुस्तकाशिवाय पान २ वर

## कृषी महोत्सवातून होणार तंत्रज्ञानाची देवाण - घेवाण

### शहरातील आझाद मैदानावर महोत्सवाचे आयोजन

**जालना । प्रतिनिधी -** कृषी विभाग, कृषी तंत्रज्ञान व्यवस्थापन यंत्रणा आत्मा यांच्या संयुक्त विद्यमाने जालना शहरातील आझाद मैदानावर जालना जिल्हा कृषी महोत्सव दि.२७ ते ३१ मार्च २०२५ या कालावधीत आयोजित करण्यात आला आहे. तरी जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी जालना जिल्हा कृषी महोत्सवात सहभागी व्हावे, असे आवाहन आत्मा नियामक मंडळाचे अध्यक्ष तथा जिल्हाधिकारी जालना डॉ. श्रीकृष्ण पांचाळ यांनी केले आहे

बदलत्या परिस्थितीत शेतकऱ्यांना उत्पादन वाढीसाठी प्रोत्साहन देण्यास अनन्यसाधारण महत्त्व आहे. प्रयोगशील व प्रगतीशील शेतकऱ्यांचे माध्यमातून शेतकऱ्यांना आपाआपसातील विचारांची देवाणघेवाण करण्यास व्यासपीठ उपलब्ध करुन दिल्यास त्यांच्यातील आत्मविश्वास वृध्दिंगत होऊ शकतो. आधुनिक कृषी तंत्रज्ञानाचा शाश्वत पद्धतीने अवलंब केल्यास शेतकरी आर्थिकदृष्ट्या उन्नत होऊन जागतिक पातळीवरील स्पर्धाक्षम वातावरणात आपले स्थान सिध्द करु शकतील. याकरिता जालना जिल्ह्यात दि.२७ मार्च २०२५ ते ३१मार्च २०२५ या कालावधीत कृषी महोत्सव चे आयोजन कृषी विभाग , कृषी तंत्रज्ञान व्यवस्थापन यंत्रणा आत्मा यांचे संयुक्त विद्यमाने जालना शहरातील आझाद मैदान येथे आयोजन करण्यात आले आहे.

कृषी विषयक विकसित तंत्रज्ञान व शासकीय योजनांची माहिती शेतकऱ्यांपर्यंत पोहोचविणे, शेतकरी, शास्त्रज्ञ आणि संशोधन विस्तार, शेतकरी विपणन साखळी सक्षमीकरण, समूह, गट संघटित करुन स्थापित शेतकरी उत्पादक कंपन्यांची क्षमता बांधणी करणे, शेतकऱ्यांच्या उत्पादनास योग्य भाव मिळावा, ग्राहकांना उच्च दर्जाचा माल मिळावा याकरिता शेतकरी ते ग्राहक थेट विक्री श्रृंखला विकसित करणे, कृषी विषयक परिसंवाद, व्याख्याने यांच्या माध्यमातून विचारांच्या देवाणघेवाणींद्वारे शेतकऱ्यांच्या समस्यांचे निराकरण करणे, विक्रेता - खरेदीदार संमेलनाच्या माध्यमातून बाजाराभिमुख कृषी उत्पादनास व विपणनास चालना देणे या या योजनेचा प्रमुख उद्देश ,

**काय असणार आहे या प्रदर्शनात**

कृषी प्रदर्शन- कृषी महोत्सवातील कृषी प्रदर्शन हा महत्वाचा घटक असून यामध्ये शासकीय दालन, विविध कंपन्यांचे स्टॉल्स, खाद्य पदार्थांचे स्टॉल्स, प्रात्यक्षिके यांचा समावेश आहे. जिल्हास्तरावर कृषी आणि पूरक व्यवसायाशी निगडित एकात्मिक शेती पद्धती संकल्पनेवर आधारित प्रदर्शनाचे आयोजन करण्यात येईल. यामध्ये कृषी संबंधित कृषी तंत्रज्ञान विभाग, कृषी विद्यापीठे, कृषी विज्ञान केंद्र, संबंधित विविध कृषी महामंडळे यांचा सक्रिय सहभाग राहिल. शासकीय यंत्रणा बरोबरच खाजगी कंपन्या, उद्योजक, बचतगट, शेतकरी उत्पादक कंपन्या यांचा सहभाग घेण्यात येईल.

जिल्ह्यातील कृषी व संलग्न क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी केलेले शेतकरी तसेच पीक स्पर्धा विजेते शेतकरी यांचा प्रशस्तीपत्रासह यथोचित सन्मान करुन स्मृतीचिन्ह वितरण करण्यात येतील.

जिल्हा कृषी महोत्सवाअंतर्गत कृषी प्रदर्शन व धान्य महोत्सवात शासकीय दालनामध्ये ४० स्टॉल्स, कृषी निविष्ठा ३०, कृषी तंत्रज्ञान व सिंचन ३०, गृहोपयोगी वस्तू ४०, धान्य महोत्सव २०, खाद्यपदार्थ २० अशा एकूण अंदाजे २०० स्टॉलचा समोवश असेल. शासकीय दालनामध्ये शासनाच्या विविध योजनांची माहिती व उपक्रम यांचे स्टॉल्स असतील. या कार्यक्रमाकरिता पुढील शासकीय विभाग, कार्यालये, यंत्रणांच्या दालनांना प्राधान्य देण्यात येणार आहे.

## जालन्यात सर्व्हायकल कॅन्सर जनजागृती रॅली

### इन्नरव्हील क्लब जालना होरायझन व अग्रशक्ती बहुमंडळाचा उपक्रम

**जालना । प्रतिनिधी -** इन्नरव्हील क्लब ऑफ जालना होरायझन व अग्रशक्ती बहु मंडळाच्यावतीने मंगळवार दि. २५ मार्च रोजी जालना शहरातून काढण्यात आलेल्या सर्व्हायकल कॅन्सर जनजागृती रॅलीला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

सकाळी ७ वाजता छत्रपती शिवाजी महाराज चौकातून क्लबच्या अध्यक्षा ड. अश्विनी धन्नावत, सुचिता बगडिया, पूजा तवरावाला, पायल अग्रवाल, अग्रशक्ती बहु मंडळाच्या अध्यक्ष रिता अग्रवाल, सचिव श्वेता अग्रवाल यांच्यासह पदाधिकारी आणि सदस्यांच्या प्रमुख उपस्थितीत रॅलीला सुरुवात झाली. या रॅलीमध्ये श्रीमती दानकुंवर कन्या




विद्यालयाच्या इयत्ता नववीच्या विद्यार्थिनी, शिक्षक, शिक्षिका, अंगणवाडी सेविका मोठ्या संख्येने सहभागी झाल्या होत्या. शहरातील प्रमुख मार्गावरून जनजागृती करत ही रॅली अमित हॉटेलमध्ये पोहचल्यानंतर ओम हॉस्पिटलच्या कॅन्सर तज्ञ डॉ. विनू अग्रवाल यांचा सर्व्हायकल व इतर कॅन्सरवर मार्गदर्शनपर कार्यक्रम झाला. यावेळी त्यांनी सर्व्हायकल कॅन्सरची लक्षणे, कॅन्सरचे विविध प्रकार, उपाययोजना, विविध तपासण्या आदीबाबत सखोल मार्गदर्शन केले. गर्भाशयाच्या मुखाचा कर्करोग (सर्व्हायकल कॅन्सर) पान २ वर

## बनावट जात प्रमाणपत्र जोडून तलाठी पदाचा कारभार पाहणारे व त्यांची पाठराखण करणाऱ्या अधिकाऱ्यांवर कारवाईची मागणी

**जालना । प्रतिनिधी -** बनावट जात प्रमाणपत्र जोडून तलाठी पाचा कारभार पाहणारे व त्यांची पाठराखण करणाऱ्या अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याची मागणी आम आदमी पार्टीचे जालना तालुकाध्यक्ष सुभाष बोर्डे यांनी एका निवेदनाद्वारे केली आहे.



जिल्हाधिकारी यांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, तलाठी भरती २०२३-२४ मध्ये अनुसूचित जमाती प्रवर्गातून वैजनाथ साहेबराव रुद्रे हे तलाठी म्हणून भरती झाले आहेत. मात्र त्यांनी आता पर्यंत सुध्दा जातीची वैधता प्रमाणपत्र दाखल केलेली नाही. तसेच पडताळणी केली असता त्यांचेकडे खोटे जातीचे प्रमाणपत्र असल्याचे कळाले आहे. तसेच सदरील जात प्रमाणपत्र काढण्याचा कालावधी हा दोन वर्षाचा असल्याचे माहिती अधिकारान्वये समजले आहे. मा. जिल्हाधिकारी यांनी आता पर्यंत दोन वेळेस संबंधीत रुद्रे यांना जात वैधता प्रमाणपत्र सादर करण्यासाठी आदेशित केलेले असतांना पान २ वर

## रोटरी क्लब जालना इलाईटतर्फे रो. अरुण अग्रवाल यांचा सत्कार



**जालना । प्रतिनिधी -** समाजसेवेतील निःस्वार्थ योगदानाबद्दल ज्येष्ठ रोटरियन अग्रवाल यांची रोटरी इंटरनॅशनलच्या सर्वोच्च सर्व्हिस अबोव्ह सेल्फ आंतरराष्ट्रीय स्तरावरील पुरस्कारासाठी निवड झाल्याबद्दल रोटरी क्लब ऑफ जालना इलाईटतर्फे त्यांचा बुधवार दि. २६ मार्च रोजी सत्कार करण्यात आला. याप्रसंगी अरुण अग्रवाल यांच्यासह त्यांच्या मातोश्री श्रीमती लिलादेवी, सुविद्य पत्नी सौ. सरलादेवी, पुत्र अनुज आणि सून सौ. पूजा अग्रवाल यांचाही यांचाही गौरव करण्यात आला. शाल. श्रीफळ आणि पुष्पगुच्छ देऊन क्लबचे अध्यक्ष राजेंद्र अग्रवाल, उपाध्यक्ष उमेश बजाज, कोषाध्यक्ष गणेश बाले, प्रकल्प प्रमुख गिरधर लधानी, शरद गादिया, संचालक सौ. विजयालक्ष्मी बाले, संतोष हुशे, डॉ. प्रल्हाद उढाण, प्रदीप भारजवाल जितेंद्र गर्ग यांनी त्यांचा सत्कार केला व त्यांच्या समाजसेवेच्या कार्यास शुभेच्छा दिल्या. यावेळी पान २ वर

# संपादकीय

## प्रदूषणाचा भस्मासुर !

स्विस संस्था आयक्युएअरने जागतिक प्रदूषणावर ११ मार्च २०२५ रोजी एक अहवाल प्रसिद्ध केला. हा अहवाल भारतासाठी धक्कादायक आहे कारण या अहवालानुसार जगातील सर्वाधिक प्रदूषित २० शहरात १३ शहरे भारतातील आहेत. या अहवालात असेही नमूद करण्यात आले आहे की भारत जगातील पाचव्या क्रमांकाचा प्रदूषित देश असून आसाम राज्यातील आसाम आणि मेघालयाच्या सीमेवर असणाऱ्या बर्णीहाट हे शहर जगातील सर्वाधिक प्रदूषित शहर ठरले आहे . तर जगातील १३८ देशांच्या राजधानीच्या शहरांपैकी दिल्ली हे सर्वात प्रदूषित राजधानीचे शहर असल्याची नोंद या अहवालात करण्यात आली आहे. या अहवालाच्या निर्मितीसाठी वातावरणातील प्रदूषणकारी घटक म्हणून ओळखल्या जाणाऱ्या पीएम - २.५ कणांचे प्रमाण बारकाईने तपासण्यात आले होते. जगातील १३८ देशांमध्ये बसविण्यात आलेल्या ३० हजार ग्राउंड मॉनिटरच्या माध्यमातून ८९५४ शहरांची माहिती संकलित करण्यात आली. या अहवालातील निष्कर्ष पाहिल्यानंतर भारतातील प्रदूषणाची समस्या किती गंभीर आहे हे लक्षात येईल. विशेष म्हणजे जगातील सर्वाधिक प्रदूषित शहरांच्या यादीत भारतातील दिल्ली, पंजाबमधील मुलतानपूर, हरियाणामधील लोणी, नवी दिल्ली, गुरुग्राम, गंगानगर, ग्रेटर नोएडा, भिवडी, ( राजस्थान - हरियाणा सीमेवरील राजस्थानच्या अल्वर तालुक्यातील शहर ) मुझ्झफरनगर, हनुमानगड, नोएडा या शहरांचा समावेश आहे. या शहरात वातावरणातील प्रदूषणकारी घटक म्हणून ओळखल्या जाणाऱ्या पीएम - २.५ कणांचे प्रमाण ५३.३ मायक्रोग्राम क्यूबिक मीटर या पातळीवर आले असून ते आरोग्य संघटनेने निर्धारित केलेल्या सुरक्षेच्या पातळीपेक्षा दहापटीने अधिक असल्याचे दिसून आले. स्विस संस्थेचा हा अहवाल देशातील नागरिकांची झोप उडवणारा आहे, कारण आज देशातील सर्वच महत्वाची शहरे प्रदूषणाने गुदमरत आहेत. त्या शहरात राहणाऱ्या नागरिकांचे जीवन प्रदूषणामुळे धोक्यात आले आहे. एकीकडे २१ व्या शतकातील सुखासीन जीवनाचे मनोहरी चित्र उभे केले जात आहे. स्मार्ट सिटीचे स्वप्न दाखवले जात आहे तर दुसरीकडे याच शहरांची फुफ्फुसे प्रदूषणाने निकामी होत आहेत. प्रदूषणामुळे या शहरातील नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे. प्रदूषणामुळे या शहरातील नागरिकांना फुफ्फुसाचे, हृदयाचे, रक्ताभिसरणाचे आजार मोठ्या प्रमाणावर होत आहेत. न्यूमोनिया, पक्षघात, हृदयविकार, फुफ्फुसाचा कर्करोग यासारखे मोठे आजार प्रदूषित हवेमुळेच होत आहेत. प्रदूषणामुळे दिल्लीसारख्या देशाच्या राजधानीची काय अवस्था झाली हे आपण पाहत आहोतच. प्रदूषणामुळे दिल्लीतील शाळा कॉलेजसना सुट्टी देण्याची वेळ प्रशासनावर येते. प्रदूषणामुळे दिल्लीत खेळला जाणारा रणजी सामना रद्द करावा लागला होता. चार वर्षांपूर्वी दिल्लीत इंग्लंड आणि भारत यांच्यात झालेल्या कसोटी सामन्यात खेळाडू चक्क मास्क लावून मैदानात उतरले होते. नंतर हा सामना देखील प्रदूषणामुळे रद्द करावा होता त्यामुळे भारताची जगात नाचक्की झाली होती. जे दिल्लीत आहे तेच मुंबईत आहे. देशाची आर्थिक राजधानी असलेली मुंबई प्रदूषणाच्या बाबतीत देशाच्या राजधानीची बरोबरी करू लागली आहे. मुंबईचे प्रदूषणही उच्चतम पातळीवर पोहचले आहे. प्रदूषणामुळे लोकांना शुद्ध हवा मिळणे दुरापास्त झाले आहे. शुद्ध हवेसाठी लोकांना पैसे मोजावे लागत आहे. मुंबई - दिल्लीसारख्या मोठ्या लोकसंख्येच्या शहरात ऑक्सिजन बार सुरू करण्यात आले आहेत. एका तासाला २०० ते ५०० रुपये मोजून नागरिक ऑक्सिजन विकत घेत आहेत. इतके होऊनही आपण त्यातून बोध घेत नाही. या मोठ्या शहरात वाहनांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढत आहे. मुंबई, पुणे, नागपूर यासारख्या मोठ्या शहरात लोकसंख्येपेक्षा वाहनांची संख्या अधिक आहे. वाढत्या वाहनांमुळे प्रदूषणात भर पडत आहे. वाहनातून बाहेर पडणाऱ्या धुरात प्रदूषणाचे प्रमाण खूप असते. धूळ, कारखान्यातून निघणारा धूर, बांधकामातून पसरणारे कण, वृक्षतोड, पृथ्वीचे वाढते तापमान, प्लास्टिकचा भस्मासुर अशा अनेक कारणांमुळे प्रदूषणाचा आलेख उंचावत आहे. स्विस संस्थेने जाहीर केलेला हा अहवाल म्हणजे धोक्याची घंटा आहे. वाढते प्रदूषण कमी करण्यासाठी वेळीच ठोस उपाय करायला हवेत. कारखान्यातून बाहेर पडणाऱ्या धुरातून प्रदूषणकारी घटक कमी करण्यासाठी अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करायला हवा. दगड खाणींवर नियंत्रण आणायला हवे. वाहनांची संख्याही कमी करायला हवी. प्रसंगी सम - विषम सारखे कठोर निर्णय घ्यायला हवेत. युरोपीय देशात प्रदूषण कमी करण्यासाठी काय उपाययोजना केल्या जातात याचा अभ्यास करायला हवा. नागरिकांनी सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेचा अधिकाधिक वापर केला पाहिजे. याशिवाय कचऱ्याचे योग्य वर्गीकरण आणि विल्हेवाट तसेच सौरऊर्जेच्या वापरावर भर द्यायला हवा. वृक्षारोपण करुन ते वृक्ष जगवले पाहिजेत. शासन, प्रशासन आणि नागरिकांच्या एकत्रित प्रयत्नांतूनच प्रदूषणाचा हा भस्मासुर रोखता येईल.

**श्याम ठाणेदार, दौंड जिल्हा पुणे, ९९२२५४६२९५**

## जालना शहरातील लाभार्थ्यांना आवाहन

**जालना । प्रतिनिधी -** जालना शहरातील संजय गांधी निराधार योजना व श्रावणबाळ सेवानिवृत्ती वेतन योजना या लाभार्थ्यांना डी.बी.टी.मार्फत त्यांच्या खात्यावर पैसे डिसेंबर-२०२४ पासुन जमा करण्यात येत आहेत. त्यासाठी लाभार्थ्यांना बँक खात्याशी आधार क्रमांक आणि मोबाईल क्रमांक लिंक करणे आवश्यक आहे. तरी संबंधित लाभार्थ्यांनी मोबाईल क्रमांक व आधार क्रमांक बँक खात्याला लिंक केल्याची पावती, ई-केवायसी पावती, वर्गवारी पुराव्याची छायांकित प्रत जालना तहसील कार्यालयात दि.३१ मार्च २०२५ पर्यंत जमा करावी. कागदपत्राची पुर्तता न केल्यास लाभार्थी अनुदानापासुन वंचित राहिल्यास त्यास लाभार्थी स्वत: जबाबदार राहील, असे जालना तहसीलदार छाया पवार यांनी प्रसिध्दीपत्रकाद्वारे कळविले आहे.

# आमदार-खासदारांनी गलेलठ्ठ पगार,भत्ते व पेंशन घ्यावेत, मग शेतकरी, गरीब व सर्वसामान्यांनी काय करावे!

आजी-माजी खासदारांचे वेतन, निवृत्तिवेतन आणि अतिरिक्त भत्यांमध्ये घसघशीत २४ टक्के वाढ करण्याचा निर्णय केंद्र सरकारने घेतल्याने शेतकरी, गरीब व सर्वसामान्यांमध्ये व्दिधा निर्माण होवून राजकीय पुढाऱ्यांच्या प्रती घृणा निर्माण झाल्याचे दिसून येते. देशात दिवसेंदिवस जनप्रतिनिधी व लोकप्रतिनिधी सोबतच राजकीय पुढारी सुध्दा मालामाल होतांना दिसतात.यावर मात्र पक्ष-विपक्ष नेहमीच चुप्पी साधुन बसतात. कारण यात दोघांचेही स्वार्थ लपलेले असते.देश चालविणारे हेच; कायदे बनविणारे सुध्दा हेच त्यामुळे मनात येईल तेवढे पगार, भत्ते व पेंशन वाढवून घेतात.ही बाब लोकशाहीच्या बाबतीत अत्यंत गंभीर व चिंताजनक आहे. देश सुजलाम सुफलाम व्हावा व सर्वांना समान अधिकार व न्याय मिळावा यासाठी आपल्या पुर्वजांनी आपल्या प्राणांची आहुती देऊन देशाला इंग्रजांच्या तावडीतून सोडवून स्वतंत्र मिळवून दिले.याकरीता देशाचे क्रांतिकारक,थोर पुरुष, राजे महाराजे, कळत-नकळत लाखो देशभक्तांनी आपल्या प्राणांची आहुती दिली तेव्हाच १९४७ उदयास आले व देश स्वतंत्र झाला आणि सर्वांनाच मोकळा स्वास घेण्याचे भाग्य लाभले. परंतु देशात गेल्या वीस वर्षांपासून राजकीय पुढारी स्वार्थी झाल्याचे दिसून येते.आज मुठभर राजकीय पुढाऱ्यांजवळ करोडो रुपयांची चल-अचल संपत्ती दिसून येते.सोबतच उच्च पदस्थ ८० टक्के अधिकारी वाममार्गाने पैसा कमवून करोडपती झालेले दिसतात.याचे जीवंत उदाहरण म्हणजे न्यायाधीश यशवंत वर्मा.म्हणजे जनुकाय देशाच्या लोकप्रतिनिधी व जनप्रतिनिधी यांनी देशाची लुट लावली की काय असे वाटत आहे.आज देशात मोठ्या प्रमाणात बेरोजगारीची समस्या, महागाईने मोठ्या प्रमाणात उच्चांक गाठला आहे, सोन्याच्या भावाने तर संपूर्ण सिमा ओलांडली आहे, बदलत्या हवामानामुळे निसर्ग शेतकऱ्यांना साथ देत नसल्याने त्यांचे हालबेहाल होत आहेत, खाजगी क्षेत्रात पगार वाढ नाही अशा परिस्थितीत सर्वसामान्यांचे जीवन जगणे अत्यंत कठीण झाले आहे, आता गरीब वर्ग हातावर आणुन पानावर खातात या संपूर्ण गोष्टी वितभर पोटाची खळगी भरण्यासाठी सर्वच धडपडत करीत असतात.परंतु सध्याच्या काळात श्रीमंत हा दिवसेंदिवस श्रीमंत होत आहे तर गरीब हा गरीबीच्या खाईत दबत आहे.आज सरकार मार्फत खासदारांना २४ टक्के पगार वाढ व पेंशन वाढ घोषित करण्यात आली,यामुळे सर्वसामान्यांपुढे अनेक प्रश्न निर्माण झाले आहे.पुर्वी १ लाख रुपये पेंशन होते आता १लाख २४ हजार रुपये झाले,पुर्वी मतदार संघाचा भत्ता ७० हजार रुपये होता आता ८७ हजार रुपये झाला, कार्यालय खर्च ६० हजार रुपये होता आता ७५ हजार रुपये झाला, पुर्वी पेंशन २५ हजार रुपये होती आता ३१ हजार रुपये झाली. हा पैसा सरकार जवळ येतो कोठुन याचा विचार खासदारांनी किंवा सरकारने कधीच केला नाही.कारण हा संपूर्ण पैसा देशाच्या १४० कोटी जनतेच्या खिशातला आहे आणि जनतेचे खिशे कापून जर खासदार वेतन वाढ करीत असेल तर देशाचे दुर्भाग्य म्हणावे लागेल. कारण आज देशातील आमदार -खासदार-मंत्री यांना जे काही पगार, पेंशन, भत्ते व इतर सुखसुविधा मिळत आहे ती फक्त देशाच्या जनतेच्या पैशाच्या बळावरच. आमदार-खासदारांना खुप काही मेहनत करावी लागत नाही किंवा कोणतेही ओझे उचलावे लागत नाही तरी त्यांना गलेलठ्ठ पगार, भत्ते व पेंशन हे देशात चाल्लय तरी काय!आज ईपीएस-९५ चा पेंशनधारक गेल्या १० वर्षांपासून मिनिमम पेंशन ७५००, महागाई भत्ता व आरोग्य सुविधांची मागणी करीत आहे याकरीता खासदार, मंत्री यांना निवेदन, चर्चा करून सुद्धा त्याकडे केंद्र सरकार दुर्लक्ष करून पाठ फिरवत आहे.आज ईपीएस-९५ पेंशन धारकांना १००० ते ३००० रूपयांपर्यंत पेंशन मिळत आहे.यात घर टॅक्स, पाण्याचे, औषधोपचार, खाण्यापिण्याचा खर्च कसा काय पुर्ण करणार अशी गंभीर परिस्थिती आज पेंशन धारकांची आहे. त्यांचाही विचार सरकार करीत नाही जनुकाय त्यांना वाऱ्यावर सोडले की काय असे वाटते.त्यामुळे तो जगुही शकत नाही आणि मरूही शकत अशी भयावह व गंभीर परिस्थिती देशाच्या दिड करोड ईपीएस -९५ पेंशन धारकांची आहे. याला कोणती लोकशाही म्हणावी किंवा सर्वसामान्यांना न्याय देणारी सरकार म्हणाव असाही प्रश्न उपस्थित होतो.आमदार असो अथवा खासदार यांना पगार, पेंशन व भत्यांची काय आवश्यकता हे तर लोकांचे कल्याण व जनसेवा करण्यासाठी आहे ना!मग यांना एवढा गलेलठ्ठ पगार भत्ते पेंशन कशाला हवे.आज शेतकऱ्यांजवळ करोडोची शेतजमीन आहे परंतु पैशाने मात्र शुन्य आहे.कारण शेतकऱ्यांच्या मालाला सरकारकडुन योग्य भाव मिळत नाही, बदलत्या हवामानामुळे निसर्ग सुध्दा साथ देत नाही.अशा परिस्थितीत शेतकऱ्यांवर आत्महत्येची पाळी येते.परंतु देशाचा आमदार-खासदार मात्र पाच वर्षात मालामाल झालेला दिसुन येतो हे स्वतंत्र भारताचे दुर्भाग्य म्हणावे लागेल. देशाची १४० करोड जनता आमदार -खासदार यांना देशाची सेवा करण्यासाठी निवडून देतात जेणेकरून देशसेवा व जनसेवा करून देश सुजलाम सुफलाम व्हावा. परंतु खासदारांच्या २४ टक्के पगारवाढीवरून असे लक्षात येते की आजचा राजकीय पुढारी फक्त स्वतःचीच व स्वतःच्या परिवाराची सेवा करण्यासाठी लोकप्रतिनिधी व जनप्रतिनिधी झाल्याचे दिसून येते.देशाच्या १८ व्या लोकसभेत निवडून आलेले ५४३ खासदारांपैकी २५१ खासदार गुन्हेगार प्रकरणात दोषी आहेत. यात ३९ टक्के मंत्री गुन्हेगार प्रकरणात दोषी आहेत,तर २८ खासदारांना वेगवेगळ्या कोर्टाने गुन्हेगार घोषित केले आहे.यातील १९ खासदारांवर हत्या आणि महिला अत्याचारांसारखे अत्यंत गंभीर आरोप आहेत, तरी यांना सरकार कडून पगार, भत्ते व पेंशन वाढ सोबतच संपूर्ण सुविधा प्राप्त आहे ही बाब शेतकऱ्यांच्या प्रती व सर्वसामान्यांच्या प्रती अत्यंत धक्कादायक बाब आहे.त्याचप्रमाणे एक स्वयंसेवी संस्था असोसिएशन ऑफ डेमोक्रॅटिक रिफॉम्सच्या (एडीआर) अहवालात असे दिसून आले की,देशातील ४५ टक्के आमदारांवर गुन्हेगारी खटले दाखल आहेत. तरी यांना पगार, पेंशन व इतर भत्ते सुरळीत मिळतात.मग प्रश्न निर्माण होतो की गुन्हेगारांना एवढ्या सुखसुविधा व शेतकरी, गरीब आणि सर्वसामान्यांचे हालबेहाल ही बाब आमदार-खासदाराच्या प्रती अत्यंत गंभीर व चिंताजनक आहे. तरीही मोठ्या डौलाने सांगतात की आम्ही समाजसेवक,लोकप्रतिनिधी व जनप्रतिनिधी आहोत.आता असे चित्र



दिसत की खासदार तुपाशी आणि सर्वसामान्य उपाशी. आमदार-खासदार यांना खरोखरच देशसेवा करायची असेल तर निस्वार्थीपणे देशसेवा केली पाहिजे. पैशांचा मोह तेवढाच ठेवावा जेवढी आवश्यकता आहे. वाजवीपेक्षा जास्त पैसा असेल तर सरकारी तिजोरीत जमा करावा जेणेकरून तो पैसा जनकल्याणासाठी व देशाच्या उपयोगात आला पाहिजे आणि देश समृद्ध झाला पाहिजे.जय हिंद!

**रमेश कृष्णराव लांजेवार**
**मो.नं.९९२१६९०७७९,**

# जीएसटी अभय योजनेचा लाभ घेण्याचे आवाहन

**छत्रपती संभाजीनगर । प्रतिनिधी -** व्याज व दंड माफीसाठी असलेल्या अभय योजनेचा लाभ घेण्यासाठी आवश्यक कर देयके (निव्वळ कराचे पैसे भरण्याची) शेवटची तारीख ३१ मार्च २०२५ आहे, तर या अभय योजने अंतर्गत अर्ज दाखल करण्याची अंतिम तारीख ३० जुन, २०२५ आहे. करदत्यांनी योजनेचा लाभ घेण्यासाठी पोर्टलवर अर्ज सादर करण्याचे आवाहन वस्तू व सेवाकर विभागातर्फे करण्यात आले आहे. याबाबत मदतीसाठी संबंधित क्षेत्रीय जीएसटी अधिकाऱ्यांशी संपर्क करण्याचे आवाहन राज्यकर सहआयुक्त अभिजित राऊत यांनी केले आहे.

केंद्र सरकारने केंद्रीय अर्थसंकल्प २०२४ मध्ये केंद्रीय वस्तू व सेवा कर कायदा २०१७ अभय योजना जाहीर केली आहे. प्रलंबित वस्तू व सेवा कर विवादांचे निराकरण सुलभ करण्यासोबतच २०१७-१८, २०१८-१९ आणि २०१९-२० या आर्थिक वर्षांशी संबंधित जीएसटी कायद्याच्या कलम ७३ अंतर्गत जारी केलेल्या मागण्यांबाबत करदात्यांवर भार कमी करणे हा योजनेचा उद्देश आहे. या योजनेमुळे करदात्यांना योजनेच्या अटी आणि शर्तींच्या अधीन राहून केवळ मूळ कर रक्कम भरून त्यांचा थकित करांतील व्याज व दंड यांची माफी होऊन करदेयता चुकवता येणार आहे.

या व्यतिरिक्त ज्या प्रकरणांमध्ये सुरूवातीला कलम ७४ अंतर्गत २०१७-१८, २०१८-१९ आणि २०१९-२० या आर्थिक वर्षासाठी नोटीस किंवा आदेश जारी करण्यात आला होता आणि कलम ७३ अंतर्गत अपील प्राधिकरण किंवा अपीलीय न्यायाधिकरण किंवा न्यायालयाच्या निर्देशानुसार योग्य आदेश दिला आहे किंवा तो पारित करणे आवश्यक आहे, त्या प्रकरणांमध्ये व्याज आणि दंड माफ करण्याच्या उद्देशाने कलम १२८ अ अंतर्गत समाविष्ट आहे.

पैसे भरण्याची व अर्ज दाखल करण्याची तारीख एकच असल्याचा करदात्यांमध्ये गैरसमज निर्माण झाला असल्याचे दिसून आले आहे. व्याज व दंड माफीसाठी असलेल्या अभय योजनेचा लाभ घेण्यासाठी आवश्यक असलेली कर देयके (निव्वळ कराचे पैसे भरण्याची) शेवटची तारीख ३१ मार्च, २०२५ आहे, तर या अभय योजने अंतर्गत अर्ज दाखल करण्याची अंतिम तारीख ३० जुन, २०२५ आहे. करदत्यांनी या योजनेचा लाभ घेण्यासाठी पोर्टलवर अर्ज सादर करण्याचे आवाहन वस्तू व सेवाकर विभागातर्फे करण्यात आले आहे.




पान १ वरुन

### ग्रंथ हे ...

पर्याय नसल्याचे आपल्या महामानवांनी सांगितले आहे. नवे विचार मांडून समाजाला दिशा देण्याचे काम ग्रंथ करत आहे. मराठी भाषा अडीच हजार वर्षापूर्वीची असल्याने आधीपासूनच ती अभिजात भाषा आहे. यामुळेच परिवर्तन चळवळ, प्रबोधन चळवळ, वारकरी संप्रदाय चळवळ ही आपल्या महाराष्ट्रातून झाली आहे. ओवी, अभंग, पोवाडा, गवळण, भारूड, छक्कड, लावणी आदी प्रकारी हे केवळ आपल्या मराठी भाषेतच आहे. त्यामुळे मराठी भाषा ही सुरुवातीपासूनच समृध्द भाषा आहे. ग्रंथ हे आपल्याला घडविण्याचे काम करतात. ग्रंथोत्सव हे एक असे व्यासपीठ आहे की, जेथे विचारांची देवाण घेवाण होते. याकरीता विद्यार्थी आणि नागरिकांनी या ग्रंथोत्सवात सहभागी व्हावे. यावेळी सहायक ग्रंथालय संचालक सुनिल हुसे म्हणाले की, ग्रंथाशी संबंध असणारे साहित्यीक, लेखक, कवी, प्रकाशक, विक्रेते यांनी एकत्र येवून वाचन संस्कृती वाढविण्यासाठी प्रयत्न करावा यासाठी अशा प्रकारच्या ग्रंथोत्सवाचे आयोजन करण्यात येते. ग्रंथालय चळवळ ही माणसाला जगण्याची कला शिकवते. व्यक्तीमत्व विकासासाठी वाचन खुप महत्वाचे आहे. या कार्यक्रमासाठी आपल्या पालकांना सुध्दा घेवून या. आपल्या आवडणाऱ्या लेखाचे एकतरी पुस्तक प्रत्येक विद्यार्थ्याने वाचायला पाहिजे. ही पुस्तक आपण व पालकांनी तसेच शिक्षकांनी खरेदी करावी. वाचनाची आवड वाढली पाहिजे, यासाठी शासनाने आता वाचन प्रकल्प हाती घेतला आहे.

कवयित्री डॉ. तडेगावर म्हणाल्या की, मराठवाड्यात जाती-धर्म, गट-तटात भांडण अशा परिस्थितीत संत आणि महापुरुषांनी जातीच्या पलीकडे जाऊन प्रेम, स्नेहभाव निर्माण केला होता. त्यांनी दाखवलेली वैश्विक भावना ,साहित्यिकांना संवेदनशीलता, कारुण्य साहित्यात प्रकट करावी लागेल वाचनामुळे मानवाला आत्मिक समाधान मिळते. तसेच जगण्याचा दृष्टीकोन ही वाचनामुळेच बदलण्यास मदत होते. आपल्या शहरात ग्रंथोत्सवाचा मोठा कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या ग्रंथोत्सवाच्या माध्यमातून आपल्याला ज्ञानाचे भांडार उपलब्ध होणार आहे. कार्यक्रमाचे प्रास्ताविक जिल्हा ग्रंथालय अधिकारी सुभाष साबळे यांनी केले.

प्रारंभी वाचन संस्कृती वाढविण्याकरीता गांधी चमन ते टाऊन हॉल या दरम्यान ग्रंथ दिंडीचे आयोजन करुन जनजागृती करण्यात आली. ग्रंथ दिंडी मध्ये मनपाचे मुख्य लेखाधिकारी तुकाराम भिसे, मुख्य लेखा परिक्षक प्रविण निंबाळकर, कवी डॉ. ललित अधाने, सहाय्यक ग्रंथालय संचालक सुनिल हुसे तसेच लोकमान्य प्राथमिक विद्यालयाचे विद्यार्थी व शिक्षक सहभागी झाले होते. तसेच ग्रंथोत्सवानिमित्त आयोजित करण्यात आलेल्या ग्रंथ प्रदर्शनाचे देखील उद्घाटन जिल्हाधिकारी डॉ. पांचाळ यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी सार्वजनीक ग्रंथालयाचे पदाधिकारी आणि नागरीकांची उपस्थिती होती. कार्यक्रमाचे सुत्रसंचलन प्रा. रंगनाथ खेडेकर यांनी केले.

### जालन्यात सर्व्हायकल ...

हा महिलांमध्ये आढळणारा एक गंभीर आजार आहे. मात्र, योग्यवेळी तपासणी आणि प्रतिबंधात्मक उपायांनी याचे निदान आणि उपचार शक्य आहेत. सुरुवातीच्या टप्प्यात या कर्करोगाची लक्षणे स्पष्ट नसू शकतात. मात्र, काही लक्षणे दिसू लागताच त्वरित डॉक्टरांचा सल्ला घ्यावा. सर्व्हायकल कॅन्सरचे निदान करण्यासाठी पॅप स्मीयर, एचपीव्ही या चाचण्या करून घ्याव्यात. उपचाराची निवड कर्करोगाच्या टप्प्यावर आणि रुग्णाच्या स्थितीवर अवलंबून असते, असे सांगून त्या म्हणाल्या की, सामाजिक संघटनांच्यावतीने आयोजित केल्या जाणाऱ्या विविध तपासण्या आणि लसीकरण या उपक्रमात सहभागी व्हावे, असे आवाहन त्यांनी केले.

यावेळी ॲड. अश्विनी धन्नावत म्हणाल्या की, महिलांच्या आरोग्याचे रक्षण करण्यासाठी आणि सर्व्हायकल कॅन्सरबद्दल जागरूकता वाढवण्यासाठी जनजागृती रॅली काढण्यात आली. आपण सर्वांनी मिळून महिलांच्या आरोग्याबद्दल जागरूकता वाढवावी. आपल्या कुटुंबातील, मित्रपरिवारातील आणि समाजातील महिलांना सर्व्हायकल कॅन्सरच्या प्रतिबंधात्मक उपायांबद्दल माहिती द्यावी. त्यांना लसीकरणासाठी प्रोत्साहित करावे आणि नियमित आरोग्य तपासणीचे महत्त्व पटवून द्यावे, असे आवाहन त्यांनी केले.

### बनावट जात ...

देखील त्यांचे आदेश डावलुन अद्यापही जात वैधता प्रमाणपत्र सादर केलले नाही. तसेच आता पर्यंत आम्ही संदर्भीय पत्रान्वये संबंधीताची चौकशी होऊन त्यास बडतर्फ करुन, त्याची नियुक्ती रद्द करुन गुन्हे दाखल करण्याची मागणी केलेली होती. मात्र प्रशासकीय स्तरावर आस्थापेनेचे कर्मचारी व निवासी उपजिल्हाधिकारी यांचे सहानुभुतीमुळे आणि पाठीशी घातल्यामुळे अद्यापही कार्यवाही झालेली नाही. नुकतेच तलाठी म्हणुन रुजु झालेले रुद्रे हे जर नौकरीला लागण्यापुर्वीच बनावट कागदपत्रांचा खेळ करत असतील तर प्रशासकिय व्यवस्था चालवतांना ते शासन नियमांची पायमल्ली करुन त्यावर सर्वसामान्य जनतेला तुडवतील यात शंका नाही.

येत्या ८ दिवसांत संबंधीत तलाठी रुद्रे, आस्थापेनेचे कर्मचारी जुनारे आणि निवासी उपजिल्हाधिकारी महाडीक यांचे वर कार्यवाही न झाल्यास तथा त्यांनी तलाठी रुद्रे यांना बडतर्फ करुन त्यांच्यावर गुन्हे दाखल न केल्यास येत्या ८ दिवसांत जिल्हाधिकारी कार्यालया समोर अमरण उपोषण करण्याचा ईशारा आम आदमी पार्टीचे जालना तालुकाध्यक्ष सुभाष बोर्डे यांनी दिला आहे.

### रोटरी क्लब ...

आपल्या भावना व्यक्त करताना अरुण अग्रवाल म्हणाले, 'सर्व्हिस अबोव्ह सेल्फ' पुरस्कार माझ्यासाठी अत्यंत सन्मानाची बाब आहे. माझ्या कुटुंबियांच्या आणि रोटरी क्लबच्या सहकार्यामुळेच हे शक्य झाले आहे. समाजसेवा ही माझी जीवननिष्ठा आहे आणि या सन्मानामुळे माझ्या सेवाभावी कार्याला आणखी प्रेरणा मिळेल.

## ‘आम्हाला गर्व हिंदुत्वाचा उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसैनिक’ व्हॉट्सप ग्रुपची नवीन कार्यकारणी जाहीर



**मुंबई -** आम्हाला गर्व हिंदुत्वाचा संपूर्ण महाराष्ट्रातील उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसैनिक सदस्य असलेला ८०% समाजकारण २०% राजकारण करत सामाजिक २४ उपक्रम आतापर्यंत केलेला व्हॉट्सप ग्रुप या ग्रुपची नवीन कार्यकारणी सदस्य रविवार दि.२३ मार्च २०२५ रोजी जाहीर करण्यात आली आहे. यावेळी(संतोष मा.पाटील- संस्थापक,संचालक,विरार विभाग) (महेंद्र रा.गुरव-संचालक,बदलापूर विभाग) (सुरेश वाडकर- अध्यक्ष,घाटकोपर विभाग) (बाळासाहेब निकम- उपाध्यक्ष,घाटकोपर विभाग)(जितेंद्र पाभरेकर-उपाध्यक्ष, अंधेरी विभाग) (लवेश म्हात्रे-सेक्रेटरी,उरण विभाग) (वासंती गोताड-उपसेक्रेटरी,अँटोपहील विभाग) (भालचंद्र उकिर्डे-उपसेक्रेटरी,कुर्ला विभाग) (सूर्यकांत कडू-खजिनदार,घाटकोपर विभाग) (सुजाता धारगळकर-उपखजिनदार, कल्याण विभाग)(सोनिया पाटील-उपखजिनदार, विरार विभाग)(रंजीत नरवणकर-कार्यालय प्रमुख,चेंबूर विभाग) (संदीप गुरव-उप कार्यालय प्रमुख,अंधेरी विभाग) (प्रवीण कोरपे-उप कार्यालय प्रमुख,मालाड विभाग)(संतोष झोळ-सल्लागार, भिवंडी विभाग) (लक्ष्मण सकपाळ-सल्लागार,घाटकोपर विभाग) (लिलाधर भोईर-सल्लागार,पनवेल विभाग)(दिलीप गावडे-कार्यकारणी सदस्य,डोंबिवली विभाग) (अनिल कांबळे-कार्यकारणी सदस्य, बदलापूर विभाग) (विलास चव्हाण-कार्यकारणी सदस्य, भाईंदर विभाग) अशा प्रकारे संपूर्ण कार्यकारणीची निवड करण्यात आली आहे. यावेळी नवीन कार्यकारिणी यांना आम्हाला गर्व हिंदुत्वाचा उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसैनिक व्हॉट्सप ग्रुपच्या सर्व सदस्य परिवाराकडून अभिनंदन करत पुढील वाटचालीस शुभेच्छा देण्यात आल्या.

# रुक्मिणी परिवारातर्फे शनिवारी चैत्र पालवी संगीतमय कार्यक्रम

**जालना । प्रतिनिधी -** जालना शहरातील रुक्मिणी परिवारातर्फे गुढीपाडवा व हिंदू नववर्षानिमित्त मागील २५ वर्षापासून संगीत मैफलीचे आयोजन करण्यात येत असते, रोप्य महोत्सवी वर्षानिमित्त यंदा २९ मार्च शनिवार रोजी रुक्मिणी गार्डन येथे सुप्रसिद्ध टीव्ही कलावंत चैतन्य कुलकर्णी,शाल्मली सुखठणकर तसेच प्राची खोत यांची हिंदी मराठी गीतांची मैफल 'चैत्र पालवी' या संगीतमय कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे .

मागील २५ वर्षांत स्वर साक्षी, स्वरसुर्य, सुरभी, स्वरगंगा, हे सुरांनो चंद्र व्हा,चैत्र पालवी, गाणे मंगेशाचे, भावपुष्प, भूपाळी ते भैरवी, ललित रंग, अक्षय लावणी, स्वराभिषेक, नाट्यरंग, संगीत कट्यार काळजात घुसली, वसंत बहर, भाव सरिता, मर्मबंधातली ठेव, याद न जाये, माझ्या मराठीची बोलू कौतुके आदी सुरेल मैफली व सुप्रसिद्ध कलावंत डॉ. सलील कुलकर्णी, अनुराधा मराठे, सचिन नेवपुरकर, सचिन करंबेळकर, स्वरदा गोखले, सायली पानसे, चारुदत्त आफळे, ऋषिकेश रानडे, सुवर्णा माटेगावकर, प्राजक्ता जोशी, अतुल दिवे, सूर्यकांत शेजुळ, धनश्री तुळपुले, यज्ञेश्वर लिंबेकर, पंडित शौनक अभिषेकी, आशाताई



खाडिलकर, रामदास कामत, चंद्रकांत लिमये, बकुळ पंडित, त्यागराज खाडिलकर, प्रथमेश लघाटे, मुग्धा वैशंपायन अमेय जोग, प्रमोद रानडे, संजीव मेहंदळे, ऋषिकेश बडवे, अजित परब, रसिका गानू , स्वप्नजा लेले, संदीप उबाळे यासह अनेक कलावंतांनी या कार्यक्रमात हजेरी लावली आहे.

२५ वर्षे संगीत मैफलीचे आयोजन करणारी रुक्मिणी परिवार जालन्यातील एकमेव संघटना आहे. रुक्मिणी परिवाराचे प्रमुख श्री सुरेश मगरे यांच्या संकल्पनेतून

हिंदू नववर्षाचा उत्सव व सुरेल संगीत जालनेकर रसिकांसाठी पोहोचावे या उद्देशाने रुक्मिणी परिवारातील सर्व मित्र हे कार्य करीत आहेत. केवळ संगीत मैफलीचे आयोजनावर न थांबता रुक्मिणी परिवाराच्यावतीने दयनीय अमरधाम स्मशानभूमीचा विकास, स्थानिक कलावंतांना प्रोत्साहन देणे, विद्यार्थ्यांसाठी करिअर मार्गदर्शन, घानेवाडी येथील गाळ काढण्याचा उपक्रमात तन-मन-धनाने सहभाग यासारखे अनेक कार्यामध्ये हे सर्व मित्र कार्य करीत आहे.

जालनेकर रसिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून या सुरेल संगीत कार्यक्रमाचा आनंद घ्यावा व निशुल्क प्रवेशिकेसाठी हॉटेल मधुबन, आरती फूड शनी मंदिर जुना जालना, श्री फॅब्रिकेटर नूतन वसाहत, श्री स्वामी असोसिएट्स मस्तगड, देकु केटरर्स मुक्तेश्वर लॉन्स जुना जालना येथे संपर्क करावा, असे आवाहन रुक्मिणी परिवाराच्यावतीने करण्यात आले आहे.

# शाश्वत विकासासाठी माणूस महत्त्वाचा - कुलगुरू डॉ. म्हस्के

**नांदेड । प्रतिनिधी -** जगामध्ये वेगवेगळ्या देशात विकासासाठी स्पर्धा लागलेली आहे. जलद विकास घडवून आणण्यासाठी देशातील नैसर्गिक साधनसमग्रीचा अमाप वापर करून आर्थिक विकास करण्याचा प्रयत्न होत आहे. हा आर्थिकविकास होत असताना नैसर्गिक साधन सामग्रीचा विनाश होतो की काय? अशी शंका येत आहे. यामुळे जागतिक पातळीवर आर्थिक विकास होईल हे पण या विकासामध्ये माणसाचे अस्तित्व शिल्लक राहणार नाही असे वाटते. म्हणून शास्वत विकासामध्ये माणूस टिकणे महत्त्वाचे आहे. असे प्रतिपादन कर्मवीर भाऊराव पाटील विद्यापीठ सातारा चे कुलगुरू डॉ.ज्ञानदेव म्हस्के यांनी केले .

ते पीपल्स कॉलेज नांदेड येथे प्रा. आर. एस. सोळुंके व्याख्यानमालेमध्ये ‘सर्व समावेशक शाश्वत विकासाच्या दिशेने भारत‘. या विषयावर प्रमुख वक्ते म्हणून ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ. अनिलकुमार वावरे (अध्यक्ष - मराठी अर्थशास्त्र परिषद) हे होते. या कार्यक्रमाचे उद्घाटन स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड चे प्र- कुलगुरू डॉ. ए. एम. महाजन यांनी केले. या कार्यक्रमासाठी प्रमुख अतिथी म्हणून प्रा. आर. एस. सोळुंके उपस्थित होते. यावेळी मंचावर मराठी अर्थशास्त्र परिषदेचे कार्याध्यक्ष डॉ.अविनाश निकम, कार्यवाह-खजिनदार मारोती तेगमपुरे, कार्यकारी मंडळाचे सदस्य डॉ. विजय भोपाळे, डॉ. सुभाष सावंत व परिषदेचे माजी अध्यक्ष डॉ. दिलीप अर्जुने पीपल्स कॉलेज चे उप प्राचार्य डॉ. ए. एन. सिद्धेवाड डॉ. सचिन पवार यांची उपस्थिती होती.

पुढे बोलताना कुलगुरू डॉ. ज्ञानदेव म्हस्के म्हणाले की, आर्थिक विकासाच्या हव्यासामुळे पर्यावरणातील नैसर्गिक घटक संपुष्टात येत आहेत. त्याचबरोबर उत्पादन घटकाची मालकी काही ठराविक लोकांकडे निर्माण होत आहे. यामुळे आर्थिक विषमता मोठ्या प्रमाणात वाढत आहे. तर दुसऱ्या बाजूला केवळ उपभोक्ता वर्ग वाढत आहे. असा विषम आर्थिक विकास करत असताना माणूस जिवंत राहिला पाहिजे. देशाच्या विकासात माणूस महत्त्वाचा आहे . याचा विचार करणे आवश्यक आहे. असे प्रतिपादन त्यांनी यावेळी केले.

कार्यक्रमाचे उद्घाटन स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचे प्र कुलगुरू डॉ. ए. एम. महाजन यांनी केले. ते आपल्या उद्घाटकीय भाषणात म्हणाले की, नवीन शैक्षणिक धोरणामध्ये पर्यावरणाला महत्त्व दिलेले आहे. पर्यावरणाची जाणीव व्हावी यासाठी अभ्यासक्रम तयार करण्याला प्राधान्य दिले गेले पाहिजे. याचा विचार प्राध्यापक आणि विद्यार्थी मित्रांनी करावा. पर्यावरणाचा विचार करूनच नवीन शैक्षणिक धोरणाची अंमलबजावणी करावी लागेल असे भाऊ उद्गार त्यांनी यावेळी काढले.

प्रा.आर.एस. सोळुंके व्याख्यानमालेच्या निमित्ताने कार्यक्रमाचे प्रास्ताविक पीपल्स कॉलेजमधील अर्थशास्त्र विभाग प्रमुख प्रा.विकास सुकाळे यांनी केले. त्यांनी कार्यक्रमाच्या आयोजनाची भूमिका स्पष्ट केली . मराठी अर्थशास्त्र परिषदेचे कार्याध्यक्ष अविनाश निकम यांनी मराठी अर्थशास्त्र करून प्रा. आर. एस. सोळुंके व्याख्यानमाला आयोजनाची मागील पार्श्वभूमी स्पष्ट केली. या कार्यक्रमांमध्ये प्रा. आर. एस. सोळुंके यांनी या विद्यार्थ्यांनी समावेशक आर्थिक विकास करत असताना देशातील साधन सामग्री भविष्यकालीन पिढीसाठी शिल्लक राहणे आवश्यक आहे. अशा



परिषदेतर्फे राबवल्या जाणाऱ्या विविध कार्यक्रमाची माहिती दिली. मराठी अर्थशास्त्र परिषदेचे कार्यवाह-खजिनदार डॉ . मारोती तेगमपुरे यांनी प्रा. आर. एस. सोळुंके यांचे अर्थशास्त्र विषयातील तसेच ग्रामीण भागातील विद्यार्थी घडवण्यामध्ये योगदान स्पष्ट केले. ही व्याख्यानमाला म्हणजे प्रा.आर. एस. सोळुंके यांच्या कार्याचा खऱ्या अर्थाने गौरव आहे असे प्रतिपादन आयोजित केलेल्या कार्यक्रमाबद्दल कृतज्ञता व्यक्त केली आणि या कार्यक्रमाला ग्रामीण भागाच्या विकास साठी स्थानिक पातळीवर काम करणारे तसेच वेगवेगळ्या क्षेत्रातील विचारवंत यांना बोलावून त्यांचे मार्गदर्शन घ्यावे अशा प्रकारची अपेक्षा व्यक्त केली. कार्यक्रमाच्या अध्यक्षपदावरून बोलताना डॉ. अनिलकुमार वावरे म्हणाले की, कोणत्याही देशाचा सर्व प्रकारचा विचार प्रत्येक देशांनी करावा. या कार्यक्रमासाठी पीपल्स कॉलेजचे उपप्राचार्य डॉ. ए. एन. सिधेवाड, डॉ. सचिन पवार तसेच महाराष्ट्रातील विविध महाविद्यालयातील अनेक प्राध्यापक, प्राचार्य, अर्थशास्त्र विभाग प्रमुख, व विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन एस.टी. जनकवाडे यांनी केले तर आभार प्रा. बी. एन. कदम यांनी मानले.

## अंत्योदय व प्राधान्य कुटुंब लाभार्थ्यांनी ॲपद्वारे ई-केवायसी करावी -जिल्हा पुरवठा अधिकारी सविता चौधर

**जालना । प्रतिनिधी -** महाराष्ट्र शासनाने शिधापत्रिकाधारकांना ई-केवायसी करणे बंधनकारक केले आहे. अंत्योदय आणि प्राधान्य कुटुंब लाभार्थीसाठी सरकारने एनआयसीच्या सहकार्याने लाभार्थ्यांच्या सोयीसाठी मेरा ई-केवायसी हे ॲप सुरू केले आहे. स्वस्त धान्य दुकानदारांनी देखील शिधापत्रिकाधारकांना सहकार्य करून सर्व लाभार्थ्यांची ई-केवायसी लवकरात लवकर पूर्ण होण्याच्या दृष्टीने प्रयत्न करावेत, जेणेकरून राष्ट्रीय अन्न सुरक्षा योजनेचे लाभार्थी धान्यापासून वंचित राहणार नाही. तसेच लाभार्थ्यांनीही ॲपद्वारे ई-केवायसी पूर्ण करावी, असे आवाहन जिल्हा पुरवठा अधिकारी सविता चौधर यांनी केले आहे.

स्वस्त धान्य दुकानातून ई-पॉस मशीनद्वारे मोफत केवायसी केली जात आहे. परंतु लहान मुले आणि वृद्ध लोकांना बोटांचे ठसे आणि डोळ्यांद्वारे स्कॅन करताना अडचणी येत आहेत. त्यामुळे शासनाने मेरा ई-केवायसी ॲप तयार केले असून त्यावरून लाभार्थी दुकानात न जाता स्वतःचे आणि त्यांच्या कुटुंबियांचे केवायसी घरबसल्या पूर्ण करू शकतील. मात्र त्यासाठी आधार क्रमांक मोबाईलशी लिंक असणे आवश्यक आहे. ही सेवा फक्त महाराष्ट्रातील लाभार्थ्यांसाठी असून, महाराष्ट्राबाहेरील स्थलांतरीत लाभार्थ्यांसाठी आयएमपीडीएस केवायसी पर्याय उपलब्ध आहे.

लाभार्थ्यांनी घरबसल्या ई-केवायसी पूर्ण करण्यासाठी झश्ररू डीश वरून चशीर शघधउ आणि रवहररीॠलशठऊ हे दोन्ही ॲप डाऊनलोड करून मोबाईलमध्ये इन्स्टाल करावीत. दोन्ही इन्स्टाल ॲपना आवश्यक परवानग्या देऊन, चशीर शघधउ ॲप उघडून राज्य महाराष्ट्र निवडावे. आधार क्रमांक टाकून आधारशी संलग्न मोबाईलवर आलेला जढझ टाकून, कॅप्चामध्ये दिलेल्या कोडची नोंद करावी. चेह-याद्वारे पडताळणी करण्याकरिता सेल्फी कॅमेरा चालू करून चेहरा स्कॅन करावा. स्क्रीनवर दिलेल्या सुचनांनुसार डोळ्यांची उघडझाप करा. दुस-या व्यक्तीची केवायसी करत असल्यास बॅक कॅमेरा वापरावा.

## डॉ. देवेश पाथ्रीकर यांना राज्यस्तरीय आरोग्यरत्न पुरस्कार

**बदनापूर । प्रतिनिधी -** संजीवनी फाउंडेशन महाराष्ट्र राज्य आयोजित शिवछत्रपती महाराष्ट्र गौरव पुरस्कार२०२५ विविध क्षेत्रात काम करणाऱ्या कर्तबगार व्यक्तीचा मानाचा समजला जाणार राज्यस्तरीय पुरस्कार देऊन गौरव करण्यात येतो. आरोग्य क्षेत्रात विशेषतः बदनापूर तालुका मोतीबिंदूमुक्त करण्यासाठी निर्मल क्रीडा व समाज प्रबोधन ट्रस्टचे अध्यक्ष डॉ. देवेश पाथ्रीकर हे करत असलेल्या कार्याबद्दल त्याना राज्यस्तरीय आरोग्य रत्न पुरस्कार जाहीर झाला आहे. हा पुरस्कार



शनिवार २९ मार्च रोजी लोकशाहीर अण्णाभाऊ साठे नाट्यमंदिर, सिन्नर, ता. सिन्नर जि. नाशिक येथे विधान परिषदेचे विद्यमान सभापती ङनामदार प्रा.राम शिंदे व इतर मान्यवराच्या उपस्थितीत प्रदान करण्यात येणार आहे.

# वरळी येथिल ऐतिहासिक जांभोरी मैदानातुन सुरु होणार भव्य गुढीपाडवा शोभायात्रेचे आयोजन

**वरळी । प्रतिनिधी -** हिंदू नववर्षाच्या स्वागतासाठी शिवसहाद्री फाउंडेशनच्या वतीने आम्ही वरळीकर या संकल्पनेतून भव्य गुढीपाडवा शोभायात्रेचे आयोजन करण्यात आले आहे. यंदाचे पंधरावे वर्ष असुन जल्लोषात व उत्साहात रविवार दिनांक ३० मार्च २०२५ रोजी सकाळी ८.०० वाजता पारंपरिक वाद्यांचा गजर, मर्दानी खेळ, आकर्षक गुढ्या आणि विविध देखाव्यांसह ही शोभायात्रा मोठ्या उत्साहात पार पडणार आहे. यंदाच्या शोभायात्रेचे विशेष आकर्षण म्हणजे आपल्या मराठी भाषेला मिळालेला अभिजात दर्जा,मिळाला याचा सन्मान म्हणून शोभायात्रेत सहभागी होणार्या प्रत्येक शालेय मुलांना व महिलांना उपयुक्त अशी मराठी पुस्तक भेट स्वरुपात देण्यात येणार आहे. तसेच वरळी विभागातील स्थानिक मराठी लेखक, कवी आणि पत्रकारांचा विशेष सन्मान करण्याचे नियोजन आहे.

शोभायात्रेत वारकरी भजनी मंडळांचा भक्तिमय गजर, साई पालखी सोहळ्याची भव्य मिरवणूक, ऐतिहासिक शिवराज्याभिषेक सोहळ्याचे भव्य चित्ररथ, तसेच रामायणातील राम-सीता यांचे जीवन दर्शन घडवणारा देखावा हे प्रमुख आकर्षण असणार आहे. यामुळे इतिहास,भक्ती आणि संस्कृती यांचा अनोखा संगम या शोभायात्रेत पाहायला मिळणार आहे. मराठी भाषेच्या प्रचारासाठी विशेष उपक्रम शोभायात्रे दरम्यान शालेय मुलांनी अधिकाधिक मराठी भाषा व मराठी वर्तमानपत्रे वाचावीत आणि लिहावीत यासाठी मराठी भाषेतील घोषवाक्य,पंचलाईन आणि प्रेरणादायी फलक तयार करण्यात येणार आहेत. हे फलक आणि घोषवाक्ये शोभायात्रेत प्रदर्शित करण्यात येणार असून, quot;मराठी वाचा, मराठी बोला, मराठी लिहाquot; हा संदेश प्रभावीपणे देण्यात येणार आहे. यामागचा मुख्य उद्देश म्हणजे आपल्या मराठी भाषेचा जास्तीत जास्त प्रसार आणि वृद्धी साधणे. यात्रेच्या आकर्षणात भर घालण्यासाठी तरुण-तरुणींनी पारंपरिक मराठमोळ्या वेशात, अभिमानाने फेटे परिधान करून सहभागी व्हावे आणि या सोहळ्याची शोभा वाढवावी, असे आवाहन करण्यात आले आहे. पारंपरिक वेशभूषेतील नागरिक भगव्या ध्वजांसह सहभागी होणार असून, ढोल-ताशांच्या निनादात संपूर्ण वरळी परिसर दणाणून जाणार आहे. शोभायात्रेची सुरुवात स्थळ - ऐताहासिक जांबोरी मैदान येथून वेळ - सकाळी ८.०० सूरु होणार असून, ती डॉ.जी.एम.भोसले मार्ग पुढे जाईल. शिवसहाद्री फाउंडेशनचे अध्यक्ष श्री.संजय कदम यांनी सांगितले की, गुढीपाडवा हा मराठी संस्कृतीचा अभिमानाचा दिवस आहे. यंदा मराठीला अभिजात दर्जा मिळाल्याच्या निमित्ताने, आम्ही या शोभायात्रेत विविध ऐतिहासिक, धार्मिक आणि सांस्कृतिक देखावे सादर करून एक आगळावेगळा सोहळा साकारत आहोत. नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून या ऐतिहासिक क्षणाचे साक्षीदार व्हावे. असे आवाहन आयोजनकांनी केले आहे.

# ॲड सुभाष राठोड यांना भारतसरकारच्या वतीने नोटरी सर्टिफिकेट

**जालना । प्रतिनिधी -** जिल्ह्यातील नामांकित वकीली पेशा, सामाजिक बांधिलकी जोपासणारे व सांस्कृतिक आवड असलेले असे बहुआयामी अँड सुभाष राठोड यांना भारत सरकारच्या वतीने नोटरी सर्टिफिकेट मिळाल्याने सर्व मित्र परिवार व सामाजिक चळवळीतील, संघटना व मान्यवरांकडून त्यांचे सत्कार करण्यात आले यावेळी मा.मोहणभीया राठोड,सेनि रजिस्ट्रार, डॉ.ओकार चव्हाण, राजेश पवार जालना जिल्हाध्यक्ष राष्ट्रीय बंजारा परीषद ,व नंदुसिंग नेणावत, डॉ सोपान चव्हाण,संजय राठोड, पोलिस जमादार, गुलाब राठोड सर,संजय पवार, चडएइ कॉंनटकटर , अनिल चव्हाण, गोरखनाथ चव्हाण,कॉनटॅक्टर अनिल हटवार साहेब,संजय पवार, ठेकेदार चडएइ व इतरही बहुतांश मान्यवर पदाधिकारी उपस्थित होते. त्यांच्या या कार्याची स्तुती करतांना त्यांना पुढील यशस्वीपणे कार्यासाठी वाटचालीसाठी शुभेच्छा देण्यात आले.



## गिग वर्कर, प्लॅटफॉर्म वर्कर व ॲग्रिगेटर यांनी ई-श्रम पोर्टलवर नोंदणी करावी - जिल्हाधिकारी

**जालना । प्रतिनिधी -** ई-श्रम पोर्टलवर केंद्र शासनाने गिग व वर्कर, प्लॅटफॉर्म वर्कर व ॲग्रिगेटर यांची नोंदणी करण्यास सुरवात झाली आहे. सधारनताः गिग व प्लॅटफार्म वर्कर म्हणजे शेरिंग वाहन कामगार, अन्न व किराणा पुरवठा करणारे कामगार, लॉजिस्टीक सेवा देणारे कामगार आदि मार्केटमध्ये ऑनलाईन काम करणारे कामगार, प्रोफेशन सर्विस देणारे कामगार, हेल्थ केअर सेवा देणारे कामगार, ट्रॅव्हल व आदरातिथ्य करणारे कामगार, मिडिया सर्विसेस हे सर्व प्लॅटफॉर्म गिग वर्करच्या व्याख्येत येतात. अमॅझोन, फ्लीपकार्ट, मिंत्रा, स्नॅपडिल, अजिओ, मिशो, स्विगी, झोमॅटो अशा वेगवेगळ्या ऑनलाईन प्लॅटफॉर्मवर काम करणारे कामगार हे सर्व ई श्रम eshram.gov.in वर नोंदित होवू शकतील व केंद्र सरकारकडे त्यांचा डेटा तयार होईल म्हणुन दि. १ एप्रिल २०२५ पासून सर्व गिग कामगारांनी ई-श्रम पोर्टलवर नोंदणी करावी. डिजिटल मध्यस्थी सर्व ॲग्रिगेटर यांनी ३१ मार्च २०२५ रोजी पर्यंत register.eshram.gov.in//user/platform-worker-registration या संकेतस्थळावर नोंदणी करावी, असे आवाहन जिल्हाधिकारी डॉ.श्रीकृष्ण पांचाळ यांनी केले आहे.







राज्यासह जालना जिल्ह्यातही उन्हाचा पारा चढला असून जालना शहरातील तापमान ३९ अंश सेल्सिअस पर्यंत पोहचले होते. उन्हाचा बचाव करण्यासाठी वाहनधारकांनी रुमाल, स्कार्फ व गॉगलचा वापर केला. (छाया- किरण खानापूरे)






हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी जगदंबा प्रिंटर्स, डबल जीन, जुना जालना ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक **युवा आदर्श**, शीतल किराणा जवळ, गांधीनगर, रोहणवाडी रोड, जालना. ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके मो.नं. ८३९००९८८८६, ८३९००४८८८६,** E-mail : yuva.aadarsh@gmail.com. RNI No. MAHMAR/2019/78282 Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Jagdamba Printers, Plot no. 12 Dabal Jin, JALNA. Tq. Dist. JALNA 431203 (Maharashtra) Place of Publication Office Daily Yuva Aadarsh, Near Shital Kirana, Gandhinagar, Rohanwadi Road, JALNA, Dist JALNA 431203 (Maharashtra) Editor : Deepak Shrikrushna Shelke Mob no. 8390098886, 8390048886 E-mail : yuva.aadarsh@gmail.com RNI No. MAHMAR/2019/78282. अंकात प्रकाशित होणाऱ्या लेखाशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. लेखातील मजकुरासंदर्भातील सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत लेखकाचीच असेल.